# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/08/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— फिर्यादी/पिडीता वय १४ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप. १३६/२१ कलम ३५४, ३५४ (अ) भादंवि सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील अल्पवयीन फिर्यादी/पिडीता व **आरोपी नामे— सागर सीताराम उईके, वय २० वर्ष रा. बिडगणेशपुर** हे एकाच गावात राहत असुन एकमेकांचे घराशेजारी राहतात. यातील पिडीता ही घरी एकटी असता आरोपीने फिर्यादी/पिडीतेला बोलावुन तुझ्या घरच्या कोंबडयांनी माझे अंगणात घाण केली आहे ती आधी साफ करूण दे असे म्हटले असता फिर्यादी/पिडीता ही आरोपीच्या घरासमोरील घाण साफ करूण घरी परत जात होती. तेव्हा आरोपीने पिडीतेला आवाज देवुण थांबवुन पिडीतेचा हात पकडला व जबरदस्तीने घरामध्ये घेवुन जात होता. फिर्यादीने आरडाओरड केली असता समोरच्या घरी राहणारा मुलगा तेथे आल्याने आरोपीने पिडीत/फिर्यादीचा हात सोडला.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक आरती उघडे मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. एक्स्ट्रा डी. जे. पांडे सो. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०४/०८/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. एक्स्ट्रा डी. जे. पांडे सो. यांनी वरील नमुद आरोपीस कलम ८ पोक्सो अन्वये ०३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/—रू दंड. दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए. पी. पी. परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सहायक फौजदार अनिल व्यवहारे पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांनी मदत केली आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर :— दिनांक ०३/०८/२०२३ चे १४.१५ वा. सुमारास पो.स्टे. सावनेर हद्यीत नगर परीषद हायस्कुल सावनेर शाळेतील १) दिव्यांग पिडीत मुलगा वय १३ वर्ष २) पिडीता मुलगी वय १४ वर्ष दोन्ही यांना कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यांचे अज्ञानतेचा फायदा घेऊन फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार शिंदे पोस्टे सावनेर हे करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा एच डी एफ सी एटीएम भिवापुर येथे दिनांक ०१/०८/२०२३ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने हातचालाखीने स्वत: जवळील एटीएम हे फिर्यादी नामे– प्रेमदास देवीदास दुपारे, वय ४२ वर्ष, रा. आझाद चौक वार्ड नं १३ भिवापुर ता. भिवापुर जि. नागपुर याचे एटीएम सोबत बदली करून त्यांचेंडुन त्यांचे एटीएम प्राप्त करून एटीएम स्क्रिनवरील फिर्यादीचे नाव मिटवुन देतो असे म्हणुन दोन तिन वेळा पिन नंबर टाकण्यास सांगितले व फिर्यादीचे एटीएम घेवुन निघुन गेला त्यानंतर सदर एटीएमचा वापर करून अज्ञात आरोपीने वेगवेगळया ठिकाणावरून फिर्यादीचे बॅक खात्यामधील ३२,८९३/– रू काढुन विश्वासघात व फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ४०६, ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सडमेक मो. न. ९८३४३१२७९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**